Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Displayed on :20/09/2021 Notice No. 20 SEP 2021

NO-131

**केंद्र शासनाची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्ष २०२१—२२**

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उद्देशाने पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२१—२२ साठी नविन व नूतनीकरणासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी, विद्यार्थ्यांनी दिलेल्या नियम व अटींच्या आधीन राहून विद्यार्थ्यांनी **www. scholarships.gov.in** या संकेतस्थळावर दि. ३०/११/२०२१ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत.

नियम व अटी —

१. अर्जदार हा भारताचा रहिवासी असावा.
२. अर्जदाराची अपंगत्व टक्केवारी ४० टक्के व त्यापुढील असावी.
३. अर्जदार मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
४. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.
५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.२.५० लाख इतकी असावी.
६. एका कुटूंबातील फक्त २ अपंग अपत्यांनांच सदर योजनेचा लाभ घेता येईल.

अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे

१. विद्यार्थ्याचा फोटो.
२. मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.
३. पालकांचा सन २०२०—२१ चे मा. तहसिलदार यांनी प्रमाणित केलेला वार्षिक उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

४. महाविद्यालयाची चालू वर्षाची फी भरल्याची पावती /रिसीट.
५. स्वत:च्या राष्ट्रीयकृत बॅक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.
६. विद्यार्थ्याचे अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र राज्य शासनाच्या सक्षम वैद्याकिय अधिका—याने प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.
७. आधारकार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधारकार्ड नसेल तर त्या विद्यार्थ्याने नोंदणी आयडी स्लीप किंवा बॅक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅनकार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत इ. यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.
८. आधार क्रमांक बॅक खात्याशी लिंक केलेला असणे आवश्यक आहे.

**तरी, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या स्कॉलरशिप फॉर्मची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे दि. ०२/१२/२०२१ पर्यंत 'प्रशासन भवन' येथे जमा करावेत याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 2021-22\Scholarship Notice 2021-22\Handicapped Scholarship 2020-21.docx